जानेवारी १९९०) (किंमत २ रु.

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



जानेवारी १९९०

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक
कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान, शिरडी

वर्ष ६८ वे) किंमत २ रुपये (अंक १० वा
दूरध्वनी ४१२२५६१

-: कार्यालय :-

साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/-
(ट.ख.सह)

तहहयात वर्गणी - ३०० रु.

श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे
हे श्री साईलीला मासिकाचे मुख्य उद्दिष्ट आहे.



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

९५

बऱ्याची संगत वेळेंचें। धर्माचें श्रेष्ठत्त्व जागें राखीं।।
मातापित्यावरी करीं शुद्ध प्रेम। मानीं त्या समान देवापरी।।
मातेपरी नसे प्रेमा अधिकारी। संकटें निवारी एकलीच।।
दास म्हणे स्मरें मातृउपकार। त्यामुळें उद्धार होई तुझा।।

९६

काय उपयोग उदासी राहुनी। निजदेहा हानी करीतसे।।
बोलण्याचा मान नाहीं त्या उरला। उगा संतापाला जोड मिळे।।
नाही ठेवियेलें पुढील धोरण। त्यामुळे हा शीण प्राप्त झाला।।
नहा मना करूं आतां हे चिंतन। दुर्लभ वतन भ्रष्ट होई।।

९७

सांई मोड मनाची खोड। सांई।।ध्रु.।।
चंचल मन हें धांवे चहुंकडे। केविं घडे गति गोड।।सांई.।।
कुकल्पनेच्या धरूनि आश्रया। मजला केलें रोड।।सांई.।।
दुर्बुद्धी ते जाळुनि टाकीं। पुरवी इतुकें कोड।।सांई.।।

या मासिकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | संपादकीय | – श्री. चकोर आजगांवकर | ६ |
| २. | साईमय पावन पार्ले (पूर्व) | – श्री. मु. ब. निंबाळकर | ९ |
| ३. | श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र | – | १३ |
| ४. | साईवंदना | – सौ. संगीता गोडबोले | १९ |
| ५. | दिव्य जीवनाकडे | – श्री. चकोर आजगांवकर | २० |
| ६. | प्रवचनसेवेत आलेले अनुभव | – श्री. अनिल रसाळ | २२ |
| ७. | साई-मार्ग | – श्री. शाम जुवळे | २६ |
| ८. | नामस्मरण | – श्री. दिलीप सावंत | २७ |
| ९. | श्री साईंचे सत्य चरित्र, अध्याय ४ था | – श्री. मु. ब. निंबाळकर | २९ |
| १०. | श्रद्धा आणि सबुरी | – वैखरीताई | ४१ |
| ११. | बालमन-ईश्वराचं खरं रूप | – श्री. प्रमोद रायसोनी | ४२ |
| १२. | "हा आज खांदां पाणी वाही। परी ही मूर्ती सामान्य नाहीं" | – | ४३ |
| १३. | प. पू. स्वामी ब्रह्मानंद महाराज | – सौ. विभावरी राणे | ४५ |
| १४. | गुरुस्थान | – सौ. निर्मला मालवणकर | ५२ |
| १५. | संत गजानन शेगांवीचा – शिरडीचा साईं | – सौ. मृ. ह. पुंडलिक | ५३ |
| १६. | श्री साईसत्‌चरित-अध्याय १ | – | ५५ |
| १७. | धर्म | – फकीर | ५६ |
| १८. | जय जय साई समर्था | – सौ. शैलजा कुलकर्णी | ५७ |
| १९. | तू सुखकर्ता, तू दुःखहर्ता, तू सकलांचा भाग्य विधाता | – | ५८ |
| २०. | तिळ-गूळ घ्या गोड गोड बोला | – | ६० |
| २१. | सहज सुलभ श्री साई चाळीसा | – | ६१ |
| २२. | साईगीत | – श्री. मोहन सोनवणे | ६२ |
| २३. | अनमोल दीप | – | ६३ |

# ''श्री साईलीला'' लेखक-कवींना निवेदन

## गद्य लेखन

''श्री साईलीला''कडे साहित्य पाठविताना ''श्री साईलीला'' लेखकांनी पुढील प्रकारात आपले लिखाण बसते का, याची दक्षता घ्यावी.

* दिवंगत संत महात्म्यांवर आधारित समयोचित लिखाण.
* श्री साईबाबांचे पूर्व व समकालीन संतांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली व श्री साईबाबांचे तत्त्वज्ञान, कार्यप्रणाली यातील साम्य व भेद.
* श्री साईबाबांचे उपदेश आचरण करताना आलेले अनुभव.
* श्री साईबाबांचे उपदेश, बोल व घटना यांविषयी आपल्याला झालेले आकलन, उमगलेला विश्लेषणात्मक अर्थ.
* श्री साईबाबांच्या कृपाछायेचे अनुभव.
* श्री साईबाबांच्या जीवनावरील अन्य भाषेतील समर्पक लिखाणाचे अनुवाद. (मूळ लेखकाचा, पुस्तकाचा संदर्भ देणे आवश्यक)
* बालसाईभक्तांसाठी हलक्या-फुलक्या, सहज-सोप्या भाषेत आध्यात्मिक लिखाण.

## कवितालेखन

* कवींनी आपले दर्जेदार काव्यच ''श्री साईलीला''त प्रसिद्ध करण्यासाठी पाठवावे. वृत्त, ताल, छंद वा मुक्त छंद इत्यादी आकृतीबंधात न बसणाऱ्या कविता स्वीकारणे शक्य होणार नाही. यासाठी कवितांची रचना व आशय याकडे अधिक लक्ष पुरवावे.

  ''श्री साईलीला''करिता साहित्य लिहिताना कागदाच्या दोन्ही बाजूस पुरेसा समास सोडावा, दोन ओळींच्या मध्ये पुरेसे अंतर ठेवावे, कागद जीर्ण-विजीर्ण असू नये, आशय व्यक्त करताना तो मुद्देसूद व सलगपणे मांडावा.

* ''श्री साईलीला'' लेखक-कवींनी आपल्या काव्य व लेखाची एक प्रत स्वत:च्या रेकॉर्डसाठी स्वत:कडे ठेवणे आवश्यक आहे. प्रसिद्ध न झालेले

साहित्य परत पाठविणे अशक्य आहे. तरी त्यासंबंधीची विनंती कृपया करू नये.

* लेखक-कवींनी देण्यात येणाऱ्या सूचनांचा बारकाईने अभ्यास करावा. या सूचनांनुसार निवडलेले लेख, कविता, अनुभव यांचाच प्रसिद्धी करिता विचार केला जाईल.

---

# ''श्री साईलीला'' सभासदांना निवेदन

★ ''श्री साईलीला'' संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना ''श्री साईलीला''च्या जुन्या सभासदांनी त्यांच्या ''श्री साईलीला'' सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.


★ ''श्री साईलीला'' वेष्टनावर वर्गणी केव्हा संपत असल्याचा महिना व वर्ष नमूद केलेले असते, त्या प्रमाणे वर्गणी संपण्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर आपली वर्गणी भरावी.

★ पत्त्यात बदल झाल्यास शिरडी कार्यालयाला त्वरित कळवावे, पिन कोड सहित पूर्ण पत्ता लिहावा.

★ आपल्या पत्त्यात काही दुरुस्ती सुचवायची असल्यास, पत्ता अपूर्ण लिहिला जात असल्यास त्याविषयी त्वरित शिरडी कार्यालयाच्या निदर्शनास आणावे.


★ ''श्री साईलीला'' मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभादसदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४ बी, खोदादाद सर्कल जवळ, दादर, मुंबई-४०० ०१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो ''श्री साईबाबा संस्थान शिरडी'' या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. ''संदेश के लिए स्थान'' आणि ''भेजनेवाले का नाम व पूरा पता'' असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

★ मनिऑर्डर–पत्रावर पत्ता लिहिताना वाचता येईल अशा स्पष्ट अक्षरांत लिहावा.



# संकल्प आणि सिद्धी

## संपादकीय



"श्री साईलीले"चा वर्षारंभ "रामनवमी" अंकापासून गणला जातो. तथापि इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे जगात नववर्ष जानेवारीपासून सुरु होते. या नव्या वर्षात आपण जुन्या गत दिनांचा स्मरणपूर्वक आलेख घेत असतो व नवीन संकल्पांचा शुभारंभही करीत असतो. जुने वर्ष अनेक गोड आणि कडू प्रसंगांच्या स्मृती घेऊन कधीही परत न येण्यासाठी काळाच्या अजस्त्र पडद्याआड अंतर्धान पावते. नवीन वर्ष नवीन आशाचे, आकांक्षाचे, संकल्पाचे कोवळे किरण घेऊन जीवनाच्या क्षितिजावर दाखल होते. मानवी जीवनात उत्कर्ष-अपकर्षाच्या, सुखाच्या व दुःखाच्या, छाया-प्रकाशाच्या, हार-जीतीच्या घटनांचा असा खेळ नियती खेळत असते. माणसाच्या हाती भूतकाळ नसतो. तो नियतीच्या लीलांचा आलेख म्हणून उरलेला असतो. परंतु वर्तमानकाळ व भविष्यकाळ यांची दोरी स्वतःच्या कर्तृत्वाच्या व भगवंताच्या कृपेच्या हाती असते. आपण वर्षभर सत्कर्मे केली, अपार कष्ट व परिश्रमांनी प्रत्येक दिवस घडविला व सोबत भगवंताचे अधिष्ठान ठेवले, तर वर्तमान व भविष्यकाळही सुखाचा व उत्कर्षाचा होऊ शकतो. प्रारब्धानुसार काही संकटांना व विपत्तींना सामोरे जावे लागले, तरी भगवंत साई आपल्या मनाला, बुद्धीला, श्रद्धा व सबुरीला प्रेमळ हातांनी स्पर्शून उदंड बळ व आत्मशक्ती मिळवून देतात. आपल्याला केवळ स्वतःचे जीवन घडवायचे नसते, तर समाजजीवन व राष्ट्रजीवनही सुंदर, सतेज व शुभ बनवायचे असते.

गेल्यावर्षी अनेक शुभ व उत्साहजनक घटना घडल्या. पहिली म्हणजे फेब्रुवारीतील आपला "काव्यबहार" अंक निघाला व लेखक-कवी संमेलन यांचे आयोजन करण्यात आले. "काव्यबहार" अंक हा जुन्या परिपाठाप्रमाणे निघाला. त्यात काव्यांची निवड, परिष्करण इत्यादी करण्यास पुरेसा अवधी नव्हता. मात्र रामनवमी, गुरूपौर्णिमा, विजयादशमी, "नोव्हेंबर-डिसेंबर स्वानुभव विशेषांक" हे अंक अत्यंत नावीन्यपूर्ण व वैभवशाली ठरले. फेब्रुवारीतील वैभवसंपन्न लेखक-कवी संमेलन ही एक आनंदाची पर्वणी ठरली. अत्यंत सुंदर, योजनाबद्ध, उद्बोधनपर अशी संमेलनाच्या कार्यक्रमाची मांडणी करण्यात आली. सजावटीची कलात्मकता, कार्यक्रम

पत्रिकेचा साहित्यिक गोडवा, कार्यक्रमातील भाषणे, परिसंवाद व चर्चा यांची योजना ही अत्यंत कल्पकतापूर्ण, उत्साहवर्धक व प्रेमभावाने ओथंबलेली होती. ह्या कार्यक्रमाच्या गोड स्मृती व स्मृतीचिन्हे घेऊन साईलीलेचे लेखक-कवी आपापल्या गांवी तृप्तीच्या आनंदात परत गेले. त्यानंतर मार्च, एप्रिलच्या अंकांत ह्या कार्यक्रमांचा वृत्तांत देण्यात आला.

मार्चच्या अंकापासून मराठी, इंग्रजी-हिंदी "साईलीले"च्या साहित्यिक वाङ्मयात व वैचारिक दर्जात लक्षणीय सुधारणा झाली. त्या सुधारणेचे पडसाद मराठी, इंग्रजी व हिंदी भाषिक वाचकांच्या असंख्य पत्रात उमटले आहेत. गेल्या वर्षात ह्या अंकांच्या अंतरंगात व बहिरंगात बरेच बदल घडले आहेत. त्याची ही वाचकांकडून मिळालेली पोचपावतीच समजली पाहिजे.

नव्या संपादकांनी "साईलीले"च्या स्वरूपात केलेल्या काही बदलांची येथे मुद्दाम आवर्जून नोंद करीत आहे.

(१) महाराष्ट्रातील व भारतातील संतमहात्म्यांची अत्यंत उद्‌बोधक, मार्मिक, मार्गदर्शक व साधक भक्तांना प्रेरणा देणारी वचने आम्ही अंकात पादपूरके म्हणून प्रसिद्ध करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे ह्यांचा लाभ वाचकांना घडविला.

(२) गीतेच्या अध्यायातील निवडक तत्त्वांचे मराठी व इंग्रजीतून मार्मिक दिग्दर्शनही चालू वर्षी वाचकांना घडविण्यात आले व ते कार्य अद्यापही चालू आहे.

(३) प्रत्येक महिन्यातील महत्वाच्या धार्मिक दिवसांचे व दैवतांचे मर्म विशद करणारे संपादकीय व लेख यांनी अंक सजविण्यात आले.

(४) बाबांचे जीवनचरित्र व तत्त्वज्ञान यांचे सुंदरपणे विशदीकरण करणारे लेख यांना प्राधान्य देण्यात आले आहे. त्यांत श्री. मु. ब. निंबाळकर, श्री. अनिल रसाळ, श्री. रमण रेड्डी, प्रा. श्री. र. श्री. पुजारी, सौ. उषा अधिकारी, श्री. हरिश्चंद्र म्हात्रे, डॉ. आर. रुक्मणी, श्री. सी. आर. नारायणन्, श्री. सुब्रमणियम्, प्रो. श्री. जनार्दन प्रसाद श्रीवास्तव, डॉ. श्री. दुर्गाप्रसाद शुक्ल, श्री. हरिशंकर शर्मा, प्रो. श्री. आद्याप्रसाद त्रिपाठी, डॉ. श्री. सुधांशूकुमार नायक, श्री. एस्. एम्. बॅनर्जी, डॉ. के. एस्. एस्. व्ही. प्रसाद, श्री. अनंतराम, कु. विद्युत माणिकलाल, डॉ. जी. आर. विजयकुमार, श्री. व्यंकटरामय्या, श्री. भूपतिसिंग ठाकूर इत्यादी लेखकांचा येथे गौरवपूर्ण उल्लेख करावा लागेल.

(५) "साधनेच्या विश्वात" या सदराखाली भक्ती, ज्ञान व कर्मयोगाची निरनिराळ्या संत, महंत, महात्मे आणि विचारवंत यांच्या शब्दांत अमोल शिकवण ग्रथित

करण्यात येत आहे. ही लेखमाला हे भारतीय अध्यात्माचे एक अमोल लेणे ठरेल.

(६) बालभक्तांसाठी नवी सदरे लिहिली जात आहेत.

(७) अनुभवाची निवड अधिक विश्वासार्हतेने व डोळसपणे केली जात आहे. नोव्हेंबर-डिसेंबर जोडअंक हा तर स्वानुभव विशेषांक होता.

(८) कवितांची रचना व आशय यांना प्राधान्य देऊन निवड केली जात असून त्यावर योग्य तेथे परिष्करणही होत आहे.

(९) वैचारिक, तत्त्वज्ञानपर लेखांनाही विशेष स्थान दिले जात आहे.

एकंदरीत साईलीलेचे स्वरूप अंतर्बाह्य पालटत असून ते वाचकांना दिवसेंदिवस आध्यात्मिक साहित्याचे अमोल धन देत साईबाबांचे विशाल व सम्यग् दर्शन घडवीत आहे.

या नव्या विचारांना, संकल्पनांना व संकल्पांना सर्वांचे प्रेम, सहकार्य व पसंती उत्तरोत्तर अधिकाधिक लाभावी, हीच भक्तजनार्दनापुढे प्रार्थना आहे.

**- चकोर आजगांवकर**
हंगामी कार्यकारी संपादक

**श्रीकृष्ण :** अर्जुना, माझे दिव्य विराट रूप पाहिलेस. माझी शक्ती, सामर्थ्य आणि विभुतिमत्व जाणून तू मला शरण ये. माझ्या भक्तीने मत्परायण हो. माझी सगुण भक्ती सोपी आहे. माझ्यात चित्त बुडव. मन मजकडे लाव. मत्परायण हो. सुख-दु:खाच्या, हर्षामर्षाच्या पार जा. तुला ज्ञान, ध्यान, अभ्यास योग जरी जमला नाही, तरी तू मला कर्मे अर्पण करीत जा. निदान कर्माच्या फळांचा त्याग कर. त्याने तुला शांती मिळेल.

- गीता

# साईमय पावन पार्ले (पूर्व)

- ले. कर्नल श्री. मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

श्री साईसच्चरितात अध्याय २० मध्ये **''प्रख्यात मुंबापुरी नगरी। तेथूनि अल्प अंतरावरी। पारले नाम ग्राम''** असा सध्याच्या विलेपार्ले (पूर्व) ह्या मुंबईच्या उपनगराचा उल्लेख आहे. खरोखरच, त्या काळी म्हणजे या शतकाच्या सुरूवातीला हे वांद्रे तालुक्यातील एक लहानसे खेडे होते. याचे मूळचे नाव 'विळे पाडळे' होते; त्याचे इंग्रजांनी 'व्हिलेपार्ले' केले आणि नंतर त्याचा पसारा रेल्वेलाईनच्या पश्चिमेसही वाढल्याने पार्ले (पूर्व) झाले. या स्थळाचा साईबाबांशी बराच दाट संबंध आला.

साईबाबांचे परमश्रेष्ठ भक्त कै. हरी सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित, ज्यांचे हेमाडपंतांनी 'पुण्यकीर्ति भावार्थाची ओतीव मूर्ति', बावनकसी सुवर्ण', साईंच्या 'गळ्यातील ताईत' असे अनेक गौरवस्पद शब्दांनी श्रीसाईसच्चरितात वर्णन केले आहे व ज्यांना बाबांनी ''फळा येईल तुझे इमान। धाडीन मी तुजलागी विमान। नेइन त्यात बैसवून।'' असे आश्वासन दिले होते आणि ''बोलता चालता, सगळ्या देखता, अग्निरथी एका बाकावर वाचेने साई गुणगण गात असता'', भरकन मरण देऊन पूर्ण केले होते, ते या पार्ल्याचेच निवासी होते. त्यांचा मोठ्या कम्पाउंडसह बंगला सध्याच्या नेहरू रोडवर होता. त्या रोडला दोन्ही बाजूला छेदून जाणाऱ्या लांब आडव्या रोडला आजही कै. काकासाहेब दीक्षितांचेच नाव दिलेले आहे. याच चौकात दक्षिण-पूर्व (आग्नेयी) कोपऱ्यावर, जेथे सध्या बरीच लहान-लहान दुकाने असून मागे विमल अपार्टमेंट्सचा मोठा परिसर आहे, त्या जागेवर काकासाहेबांचा बंगला होता. याच बंगल्यात कै. दासगणूंना काकांच्या मोलकरणीकडून ईशावास्य उपनिषदाच्या गूढार्थाचा उकल झाला होता. तेच हे त्या आश्चर्यकारक घटनेचे स्थळ. असो. कै. काकासाहेबांचे नातू श्री. अनिल (अध्याय ४६ मध्ये ज्या ज्येष्ठ पुत्र 'बाबू' यांचा व्रतबंध नागपूर येथे झाल्याचा उल्लेख आहे, त्यांचे धाकटे चिरंजीव) सध्या हनुमान रोडच्या परांजपे 'बी' स्कीम मार्ग नं. १ वर Kiddies Care अशी पाटी असलेल्या बैठ्या वास्तूत राहत असतात. त्यांच्याकडे कै. शामराव जयकर यांनी चितारलेले बाबांचे दगडावर बसल्याचे तैलचित्र पूजेत आहे आणि कै. मोरोपंत प्रधानांकडचे कै. जयकरांनीच चितारलेले मशिदीत बसलेले बाबांचे चित्रही खोलीत लावलेले आहे.

वर उल्लेखिलेले चित्रकार कै. शामराव रामचंद्र जयकर, ज्यांनी चितारलेले मोठे तैलचित्र आपण द्वारकामाईत मोठ्या भक्तीने व गौरवाने पाहतो, तेही पार्ल्यालाच बरेच

वर्षे राहिले होते व त्यांचे देहावसानही इ.स. १९३८ साली पार्ले येथेच झाले. त्यांच्या श्रीपाद नावाच्या चिरंजीवाने वडिलांची चित्रकला पुढे चालविली होती आणि मद्रासच्या ऑल इंडिया साई समाजच्या मंदिरातील, तसेच म्हैसूर आणि कलकत्ता येथील मंदिरातील साईबाबांची चित्रे त्यांनीच रंगवून दिली होती. शामरावांचे सध्या जिवंत असलेले एकच पुत्र श्री. सुरेन्द्र हे माहिम येथे राहतात व द्वितीय पुत्र कै. शूरसेन यांच्या विधवा पत्नी कमळाबाई, ज्यांचे वय सध्या ८७ वर्षांचे आहे, त्या पार्ल्यालाच 'विलेपार्ले साईकुटीर हाऊसिंग सोसायटी', तेजपाल स्कीम रोड नं ५ येथे राहतात.

पार्ल्याला हनुमान रोड व नेहरू रोड यांच्या मध्ये १७ टिळक मंदीर रोडवर कै. चंद्राबाई बोरकर यांच्या 'श्रीराम साई' बंगल्यात श्री साईबाबांची सुंदर बैठी मूर्ती असलेले मंदिर आहे. कै. चंद्राबाई बाबांच्या मोठ्या भक्त होत्या व इ.स. १८९८ पासून ते इ.स. १९१८ पर्यंत त्या साईबाबांच्या निर्वाणापर्यंत सतत २० वर्षे शिरडीत जात होत्या. त्यांच्यावर बाबांची अत्यंत कृपा होती. बाबांच्या देहत्यागाच्या समयी त्यांच्याजवळ हजर राहण्याचे भाग्यही त्यांना लाभले होते. त्यांचे दोन अनुभव ऐकण्यासारखे आहेत.

चंद्राबाईंचे पती रामचंद्र कधी शिरडीला गेले नव्हते व त्यांनी बाबांना कधी पाहिलेही नव्हते. ते स्वत: रेल्वेत इंजिनिअर होते. इ.स. १९०१ साली ते पंढरपूर येथे पूल बांधण्याच्या कामावर गेलेले होते. चंद्राबाई शिरडीला गेलेल्या होत्या. एके दिवशी बाबा त्यांना म्हणाले, "बाई, तू पंढरपुरला जा. मीही तुझ्याबरोबर येईन; पण मला प्रवासासाठी वाहन लागत नसते. तू मात्र लगेच नीघ." त्याप्रमाणे चंद्राबाई पंढरपुराला गेल्या; तर तेथे त्यांना कळले की, त्यांचे पती नोकरीचा राजीनामा देऊन मुंबईला निघून गेले होते. चंद्राबाई दोन सोबती घेऊन पतीच्या शोधासाठी परत मुंबईला निघाल्या. जवळ पैसे थोडेच शिल्लक राहिले होते. कशातरी त्या कुर्डुवाडीपर्यंत पोहोचल्या आणि स्टेशनवर हताश होऊन बसल्या. इतक्यात एक फकीर आला व त्याने त्यांना निराश होण्याचे कारण विचारले. चंद्राबाई काही बोलल्या नाहीत. तरीपण त्या फकिराने त्यांना त्यांचे पती दौंड स्टेशनवर आहेत, तेथे जाण्यास सांगून दौंडची तीन तिकिटेही त्यांच्या हातावर ठेवली. चंद्राबाई व त्यांचे सोबती गाडीत बसले. इकडे बोरकर दौंड स्टेशनवर चहा पिऊन एका बाकावर डुलकी घेत बसले होते. त्यांच्यासमोर एक फकीर आला व म्हणाला, "माझ्या आईकडे दुर्लक्ष करू नकोस. ती पुढच्या गाडीने अमुक नंबरच्या डब्यात बसून येत आहे"; व त्यांना डब्याचा नंबर दिला. बोरकर दचकून उठून उभे राहिले, तर फकीर कोठे नाहीसा झाला आणि गाडी प्लॅटफॉर्मवर आली. त्यातून चंद्राबाई उतरल्या आणि बोरकर त्यांना भेटले. बोरकरांनी पत्नीला कोणी एक फकीर भेटल्याची हकिकत सांगितली आणि साईबाबांचा

फोटो पाहायला मागितला. चंद्राबाईंनी तो दाखविताच बोरकरांनी तो फकीर म्हणजे साईबाबाच होते, हे ओळखले.

इ.स. १९१८ सालची गोष्ट. चंद्राबाईंचे वय ४८ वर्षांचे झालेले होते व अजून त्यांना मूल झालेले नव्हते. साहजिकच अजूनही संतती व्हावी, अशी त्यांची इच्छा होती; परंतु डॉक्टरांचे व इतर लोकांचे म्हणणे होते की, आता या वयात गर्भ राहणे शक्य नाही. बाबांना चंद्राबाईंच्या या इच्छेची कल्पना होती. एकदा ते त्यांना म्हणाले, ''बाई! तुझ्या मनात तुला काय हवे आहे बोल.'' त्यावर चंद्राबाईने उत्तर दिले ''बाबा! तुम्ही सर्व काही जाणता. मीच तुम्हाला कशाला सांगायला हवे!'' त्यानंतर चंद्राबाई दूर बसावयाच्या थांबल्या आणि काही महिन्यानंतर डॉ. पुरंदऱ्यांना दाखविले असता, त्यांनी निदान केले की, पोटात गांठ (tumour) झालेली आहे व ती शस्त्रक्रिया करून काढून घेण्याचा सल्ला दिला; पण चंद्राबाईंना ते पटले नाही व त्यांनी दहा महिने पूर्ण होईपर्यंत वाट पाहून मगच शस्त्रक्रियेबद्दल विचार करण्याचे ठरविले. डॉक्टरांचे म्हणणे होते की, इतकी वर्षे, म्हणजे ५१ वर्षांचे वय होईपर्यंत गर्भ राहिला नाही, तेव्हा आता त्यांना मूल होणे शक्य नाही; परंतु बाबांनी अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली आणि बाबांच्या समाधीनंतर बरोबर ३ वर्षे व २ दिवसांनी इ.स. १९२१ साली चंद्राबाईंना मुलगा झाला. आश्चर्य म्हणजे चेंबूर येथे प्रसूतीच्यावेळी डॉक्टरही नव्हते किंवा दाई (नर्स) ही नव्हती. आदल्या दिवशी त्यांनी नित्यनियमित सर्व घरकाम केले आणि रात्री विनाकष्ट सुखरूप बाळंत झाल्या. असो.

चंद्राबाईंना बाबांच्या कृपेने दीर्घायुष्यही लाभले. इ.स. १९५८ साली वयाच्या ८८ व्या वर्षी त्या साईचरणी लीन झाल्या. सध्या त्यांच्या सून मंगलाबाई त्यांच्या बंगल्यात मंदिराच्या वरच राहतात आणि मंदिराची व्यवस्था चोखपणे पाहत असतात.

ज्या हनुमान (मारुती) मंदिरावरून पार्ल्यातील हनुमान रोडचे नाव पडले, ते छोटेसे हनुमान मंदिर हनुमान क्रॉस रोड नं. १ वर लगेच डाव्या हाताला ठोसरवाडीत एका मोठ्या विहिरीशेजारी आहे. डाव्या हातात गदा व उजवा हात थप्पड मारायला उगारलेला, अशी ही लहानशीच; परंतु ''**भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती**'' चे यथार्थ दर्शन घडविणारी सुंदर मूर्ती आहे. हे मंदिर ठोसरवाडीचे मालक कै. नारायण महादेव ठोसर यांनी इ.स. १९१८ साली बांधले. ज्या दिवशी पार्ल्याला या मंदिराची प्राणप्रतिष्ठा झाली, त्याच दिवशी बाबांनी वझे नावाच्या ब्राह्मणाला २५ रुपये देऊन श्रीसत्यनारायणाची पूजा करवून घेतली होती. कै. नारायणराव ठोसर, ह. भ. प. दासगणूंचे कीर्तन ऐकून १९१० साली प्रथम शिरडीला बाबांच्या दर्शनाला गेले आणि ते इतके प्रभावित झाले की, पुढील सहा महिन्यांत त्यांनी शिरडीच्या नऊ वाऱ्या

केल्या. कस्टम खात्यातून निवृत्त झाल्यावर त्यांनी १९२७-१९३० वर्षांत नर्मदानदीची प्रदक्षिणा केली आणि नंतर संन्यास घेऊन "नारायण आश्रम" हे नाव धारण केले. आपली ठोसरवाडीची मालमिळकत आणि हनुमान मंदिर धाकटे बंधू रामचंद्र यांच्या नावे करून देऊन त्यांनी आयुष्यातील आपले शेवटचे दिवस सातारा जिल्ह्यात वाई येथे घालविले. त्यांचे पुतणे श्री. बद्रीनाथ रामचंद्र ठोसर (वय वर्षे ७०) सध्या मंदिराच्या शेजारीच नवीन बांधलेल्या उंच इमारतीत शेवटच्या मजल्यावर राहत असतात.

एकूण सध्याचे पार्ले (पूर्व) हे अशा प्रसिद्ध साईभक्तांच्या वास्तव्याने पावन झालेले आहे. आजसुद्धा येथे बाबांच्या धातूच्या मूर्ती बनविणारे मनोहर पितळे, बाबांची सुमधूर गीते सुरेल आवाजात गाणारे जयवंत कुळकर्णी, बाबांच्या "शिरडीचे श्री साईबाबा" या चित्रपटाचे वितरक शरद गाळवणकर वगैरे सारखे अनेक साईभक्त पार्ल्यातच राहत आहेत. वैयक्तिक दृष्ट्या माझे साईभक्त जावई श्री. उदय शिर्केही हनुमान क्रॉस रोड नं. २ आणि सुभाष रोड यांच्या मध्यभागी राहतात. त्यांच्या वास्तूच्या पश्चिमेस पार्लेश्वराचे शंकराचे आणि गणपतीचे मंदिर, दक्षिणेस हनुमान रोडवर साई हनुमान मंदिर, पूर्वेस दत्तमंदिर आणि उत्तरेस सुभाषरोडवर श्री रामांजनेय देवस्थानचे श्री राम व अंजनेय, म्हणजे अंजनीपुत्र मारुती यांचे मंदिर अशी देवालये आहेत. गेल्या २२ वर्षांत आमच्या मुलीकडे बऱ्याच वेळा येणे होते व सकाळी फिरायला निघाल्यावर एका फेरीतच या सर्व पूज्य देवतांचे दर्शन घडून मनसोक्त आध्यात्मिक शांती प्राप्त होते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, पार्ले (पूर्व) चे वातावरण अजूनही साईमय व धार्मिकदृष्ट्या शुद्ध व पवित्र वाटते. त्यातून लोकमान्य टिळकांच्या महान देमभक्तीची आणि त्यांच्या गीतारहस्यातील आध्यात्मिक ज्ञानाची आठवण करून देणारे टिळक मंदिर व टिळक विद्यालय, बाजारात मुंबईच्या कुठल्याही उपनगरात न दिसणारा ताजा व सुरेख भाजीपाला आणि मराठी नाटकांची लयलूट करून देणारे दिनानाथ नाट्यगृह ह्या गोष्टी पार्ल्याच्या सात्विक आनंद देणाऱ्या वातावरणात भरच घालतात. असो.

हल्लीच्या जिकडेतिकडे दंगेधोपे, हत्याकांड, केवळ पैशाची आराधना, प्रदूषण, गलिच्छ राजकारण यांनी बरबटलेल्या वातावरणात पार्ले (पूर्व) चे वातावरण असेच पुढे शुद्ध, सात्विक व साईमय राहो, अशी साईचरणी प्रार्थना करून हा लेख पुरा करतो.

**जुन्यातलं सोनं**

# श्री. माधवराव बळवंत (बाबांचा शाम्या) देशपांडे शिरडीकर यांचे अल्प चरित्र

**(श्री साईलीला, शके १९६२ कार्तिक अंकावरून)**

श्री दत्तचित्साइसद्गुभ्योनम:

**सखेति मत्वा प्रसभं यदुक्तम्।।**
**हे कृष्ण हे यादव हे सखेति।।**
**अज्ञानता महिमानं तवेदम्।।**
**मया प्रमादात्प्रणयेन वाऽपि।।४१।।**

-श्री. भ. गी., अ. ११

या जगतितलावर विखुरलेल्या थेट लोकमान्यादि राष्ट्रकार्य धुरंधर चिद्रत्न शिरोमणीपासून तो रस्त्यावर भीक मागणाऱ्या वेडसर मानलेल्या वृद्ध म्हाळसादेवी (म्हाळी) पर्यंत बाबांच्या असंख्य भक्तवृंदांत श्री. माधवराव देशपांडे यांचे नाव कोणास माहीत नाही, असा भक्त विरळा. अशा माधवराव बळवंत देशपांडे यांचे अल्प चरित्र आज येथे देण्याचे योजिले आहे.

माधवरावांच्या चरित्राचे निरीक्षण साधारण भक्तांच्या चरित्राप्रमाणे करण्याचे नसून अगदी निराळ्या व सूक्ष्मदृष्टीने केले पाहिजे, असे मला वाटते.

माधवरावांचा व माझा सहवास व परिचय थोड्याफार प्रमाणाने आज ३० वर्षे होता व तोही निकट संबंधाचा होता. कारण शिरडीस गेलो म्हणजे मी त्यांचे शेजारी काकासाहेब दिक्षितांचे वाड्यात ८ दिवस, १५ दिवस, महिना व दोन महिने राहत असे.

मी जे आज येथे माधवरावांचे अल्प चरित्र देण्याचे योजिले आहे, त्यातील बहुतेक सर्व भाग मी माधवरावांचे मुखातूनच घेतला आहे व तो मला सांगण्यास त्यांनी दिनांक २-४-३४ रोजी श्री बाबांचे पादुकावर चिठ्ठ्या टाकून बाबांची परवानगी घेतली होती.

## जन्म, जन्मस्थान

माधवरावांचा जन्म यजुर्वेदी देशस्थ ब्राम्हण कुलांत शके १७८२, मार्गशीर्ष शु. ५ या दिवशी नगर जिल्ह्यात संगमनेर तालुक्यात शिरडीपासून पश्चिमेस २० मैलांवर निमोण गावी झाला.

## माधवरावांचे बालपण

माधवरावांच्या मातु:श्री ह्या त्यांच्या वडिलांचे चवथें कुटुंब; पहिले तिन्ही कुटुंबांना संतति झाली नाही, म्हणून शिरडीनिवासी श्री. लक्ष्मणमामा कुलकर्णी यांच्या भगिनी ह्या त्यांनी चवथें कुटुंब केले. माधवराव हे त्यांचे पहिलेच अपत्य. माधवराव जन्मल्यावर तिसरेच वर्षी माधरावांचे वडील सहकुटुंब सहपरिवार निमोणहून शिरडीस रहावयास आले.

## शिक्षण

माधवरावांचे शिक्षण शिरडीसच झाले. ते मराठी ५-६ इयत्ता शिकले होते. त्यांना संस्कृताचा किंवा इंग्रजीचा गंध नव्हता.

## वाणी

माधवरावांचे वाणीस संस्कृताचा किंवा उच्च मराठी शिक्षणाचा संस्कार बिलकुल नसल्यामुळे व त्यांचे सर्व आयुष्य शिरडी सारख्या खेडेगावात देसोरी अशुद्ध बोलणाऱ्या मंडळींच्या सहवासात गेले असल्यामुळे त्यांच्या बोलण्यात येनी, फनी, पानी, लोनी, येडा, इचु, इठ्ठलयेनु, बोलत्यात, चालत्यात, वगैरे वगैरे अशुद्ध शब्दप्रयोग नेहमीच ऐकू येत. त्यांची घरी-दारी सर्व भाषा अशाच प्रकारची असे.

## स्थावर मिळकत व वतन

शिरडीत त्यांच्या मालकीचे लहानसे खेडेगावी थाटाचे घर आहे. निमोण शिरडी वगैरे ठिकाणी त्यांची जमीन आहे. हे निमोणचे देशपांडे, देशपांडे हक्काची रोकड रकम संगमनेर, कोपरगांव व सिन्नर तालुक्यांतून त्यांना मिळते. पहिले माधवरावांस दोन धाकटे बंधु होते; एक काशिनाथ बळवंत, दुसरे बापाजी बळवंत. काशिनाथ हे दत्तक दिले होते. त्यांचे तिकडील नाव गणेश श्रीधर. हे सर्व बंधू विभक्त असून दोघांचा परिवार शिरडीस असून तिसऱ्याचा परिवार इतरत्र आहे.

## संतति

माधवरावांची दोन लग्ने झाली. पहिल्या कुटुंबाचे नाव सौ. सावित्रीबाई. त्यांना एकच अपत्य झाले. त्याचे नाव श्री. एकनाथपंत त्यांचे लग्न झाले असून त्यांना बरीच मुलेबाळे आहेत. ते प. व. खात्यात नोकर आहेत. त्यांचे कुटुंब श्री. सौ. उमाबाई निमगांव निमोजचे गोपाळ कचेश्वर कुळकर्णी यांच्या कन्या.

माधवरावांच्या दुसरे कुटुंबाचे नाव सौ. द्वारकाबाई. त्यांना श्री. जगन्नाथपंत व उद्धवराव असे दोन मुलगे व एक कन्या सौ. बबीताई अशी तीन अपत्ये आहेत. जगन्नाथपंत व बबीताई यांची लग्ने झाली असून त्यांना मुलेबाळेही झाली आहेत. बबीताईचे सासर नगर जिल्ह्यात पारनर गावी श्रीनारायण नागेश वांदे यांचेकडे आहे. जगन्नाथपंतांचे कुटुंब सौ. राधाबाई ह्या नाशिक निवासी श्री. हरीपंत कुळकर्णी जाखुरीकर यांच्या कन्या. माधवरावांची ही चारी अपत्ये सहकुटुंब सहपरिवार हयात आहेत.

## शरीरप्रकृति

माधवरावांचे शरीर धिप्पाड, काठी उंच व मजबूत, वर्ण निमगोरा, प्रकृति निकोप व निरोगी असून त्यांचा आहार चांगला असे. त्यांचे वयाचे ७२ वर्षापर्यंत त्यांना कधीही ताप आला नाही किंवा त्यांचे डोके दुखले नाही.

## धर्म आचार व आहार

माधवराव पूर्ण सनातनी धर्माचे असून खाण्यापिण्यासंबंधी त्यांचे आचरण अतिशुद्ध व नियमबद्ध असे. काही घरांशिवाय परके ठिकाणी माधवराव कोणाकडे कधी जेवत नसत. ते स्वतः हाती करून खात. त्यांना उत्तम स्वयंपाक करता येत असे. त्यांची भूक नेहमी खरमरीत असून अग्नि प्रदीप्त असे. त्यांना हिंदु धर्माचा फार अभिमान असे.

## उदर निर्वाहाचा व्यवसाय नोकरी व वैद्यकी

माधवराव लहानपणी काही वर्षे शिरडी गावातील शाळेत दुय्यम किंवा मदतगार (असिस्टंट मास्तर) शिक्षकाचे काम करीत असत. नंतर काही वर्षे बाबांच्या परवानगीने त्यांनी शिरडीपासून ३-४ मैलांचे अंतरावर असलेल्या अस्तगाव नावाच्या गावची पाटिलकी मोठ्या थाटाने केली. नंतर मरेपर्यंत वैद्यकी केली. ते नेहमी बाबांचे नाव घेऊन औषध देत व औषधांत बाबांची उदी घालीत. बाबांच्या कृपेने त्यांचे हातांस नेहमी यश येई. त्यांना नाडी परीक्षा चांगली असे. मोठमोठ्या नामांकित डॉक्टर वैद्यांनी

हात टेकलेले रोगी ते बाबांचे नाव घेऊन बरे करीत. त्यांना रोगाची व औषधाची माहिती चांगली असे. ते कोणाजवळ वैद्यशास्त्र शिकले नव्हते, पण आर्य वैद्यकाची काही पुस्तके वाचून व बाबांचे मुखातून आलेली नानाप्रकारच्या रोगावरील औषधे लक्षात ठेवून ते वैद्यकीचा धंदा करीत. पनवेल पुराणिकांच्या कारखान्यातील व चेंबूर निवासी सांड्र बंधूंच्या कारखान्यातील औषधे ते वापरीत व काही ते स्वत: तयार करीत.

माधवराव मदत शिक्षकाचे काम करीत असल्यावेळी त्यांचा वर्ग शिरडी गावात श्री द्वारकामाई (मशीद) समोर श्री गुंड सर्कल इन्स्पेक्टर यांनी बांधलेल्या, काही दिवस श्री राधाकृष्ण आई रहात असलेल्या, शेवटी शेवटी बाबांच्या श्री श्यामसुंदर वारूचे निवासस्थान बनलेल्या लहानशा घरात असे.त्या वेळी हे घर हल्लीप्रमाणे दगडी नसून विटा मातीचेच होते. श्री द्वारकामाईस लागून असलेल्या भिंतीस एक खिडकी असे व तेथेच माधवरावांची बसण्याची जागा असे. तेथून श्री द्वारकामाईत बसलेल्या बाबांचे सर्व व्यवसाय त्यांना दिसत असत.

## माधवरावांना बाबांची सत्संगति व अतिदीर्घ सहवास

माधवराव शिक्षकाचे काम करू लागले, तेव्हा त्यांचे वय अजमासे १४-१५ वर्षांचे असेल. बाबा शिरडीस आले, ते माधवरावांचे देखतच आले. त्यावेळी माधवराव बाबांना एक धुनी लावून मशिदीत बसणारा व नेहमी चिलिम फुंकणारा वेडसर अल्पवयी १९-२० वर्षांचे वयाचा फकीर आहे, इतकेच मानीत असत. बाबा हे सिद्ध आहेत, संत आहेत, सगुण परमात्मा आहेत, ही भावना त्यांचेजवळ मुळीच नव्हती. माधवराव बाबा मशिदीत आल्यापासून लवकरच दिवसांतून बरेचवेळा बाबांकडे फक्त चिलिम ओढण्याकरता म्हणून जात.

माधवरावांची पहिली १०-१२ वर्षे बाबांसंबंधी अशाच भावनेत गेली. पुढील १०-१२ वर्षे बाबा सत्पुरुष आहेत, संत आहेत, अशा भावनेत गेली व बाबांचा जसजसा निकट व नित्य सहवास होऊ लागला व स्वत: त्यांच्या सिद्धत्वाचे प्रत्यक्ष अनुभव येऊ लागले व इतर नानासाहेब चांदोरकरादि भक्तगणांचे हजारो मूर्तिमंत अनुभव नित्य कळू लागले, तेव्हा त्यांची पुढील २०-२२ वर्षे बाबा हे सिद्ध पुरुष असून मूर्तिमंत सगुण परमात्मा आहेत, अशा दृढ भावनेत व बाबांच्या आज्ञाधारकपणात व भक्तवृंदाच्या-शुश्रुषेत गेली. याप्रमाणे माधवरावांची सुमारे ४२-४३ वर्षे अव्याहतपणे सतत बाबांच्या निकट सहवासात गेली. माधवरावांनी बाबांना प्रथम पाहिले, ते मशिदीत (द्वारकामाईत) पाहिले.

यानंतर बाबांच्या समाधीकालापासून माधवरावांच्या अंतकालापर्यंतची माधवरावांची अलीकडील २३ वर्षे वैद्यकीचा धंदा करण्यात, भक्तगणांचा परामर्ष घेण्यात व बाबांचे नामस्मरण करण्यात व बाबांच्या लीला जिज्ञासू सर्व आबालवृद्धांस सांगण्यात गेली. माधवरावांइतका बाबांचा निकट सहवास शिरडीतील श्री तात्या पाटील कोते खेरीज इतरांस क्वचितच लाभला असेल.

बाबा माधवरावांना पहिल्यापासून ''शाम्या'' म्हणून संबोधित. बाबा पुष्कळ भक्तांना निरनिराळ्या टोपण नावांनी हाक मारीत व ती सर्व नांवे अन्वर्थक असत. त्याचप्रमाणे ''श्याम'' हे नावहि अत्यंत अर्थपूर्ण आहे व त्यात अत्यंत प्रेम व एकप्रकारची जादू भरलेली आहे, असे मला वाटते.

वास्तविक श्याम हा शब्द संस्कृत असून तो विशेषण वाचि आहे. त्याचा अर्थ काळा, पण कोळशासारखा काळा कुळकुळीत किंवा काजळासारखा काळाकुट्ट किंवा कावळ्यासारखा करारी काळा नव्हे. तर, काळसर, तेजस्वी, मनोहर, चित्ताकर्षक, लावण्य व सौंदर्ययुक्त, असा आहे. शिवाय ''श्याम'' ह्या एकेरी शब्दात व ह्याच्या योगाने बनलेल्या सामासिक शब्दात पावित्र्य, अपत्यभाव व दैवी भावना भरलेल्या आहेत; जसे–

श्यामा=पवित्र तुळस व पवित्र यमुना नदी.

श्यामसुंदर=कृष्ण परमात्मा, श्यामकंठ=शंकर, श्यामांग=नवग्रहातील 'बुध' ग्रह, श्यामकर्ण=अश्वमेधांतील पवित्र, अश्व, वगैरे वगैरे.

## माधवरावांचे ''शाम्या'' हे नाव

इतर विशेषणावरून बनलेल्या विशेष नामाप्रमाणे (कृष्ण, काळ्या, सावळ्या, रोडक्या वगैरे वगैरे) 'श्याम' या विशेषणाचाही विशेषनामाप्रमाणे उपयोग प्राचीन वाङ्मयात होत असे; जसे–

'श्यामाचिया घरा वासना पै नेती' (श्रीज्ञानदेवकृत अभंग १७३)

'श्यामाची श्याम सेजवरी' (श्रीनिवृत्तिनाथकृत अभंग २०१)

'तो अर्जुन म्हणे गा तमाल श्यामा' (श्री ज्ञा., अ. १७, ओ. ३४)

उत्तर हिन्दुस्थानातील गोकुळ, मथुरा, वृंदावन निवासी व्रजांगना (गोपी) तर कृष्ण परमात्म्याला 'श्याम' खेरीज बोलतच नसत. श्याम हे नाव त्यांचे अत्यंत आवडते, प्रिय व लाडके होते. हिंदी कवी आपल्या परमात्मविषयक कवितेंत व

व्रजांगना आपल्या नेहमीच्या गाण्यात परमात्म्याबद्दल प्रामुख्याने 'श्याम' या नावाचाच उपयोग करीत असे–

"कहां गियो मोरा श्याम"

हल्ली ही कृष्ण या नावाऐवजी 'श्याम' हे नाव दक्षिण हिंदुस्थानात ठेवण्याची बरीच प्रथा पडली आहे. पुष्कळांना हे नाव फार आवडते व त्या नावात तशीच मोहकता पण आहे.

कृष्ण परमात्म्यांनीही आपले 'कृष्ण' हे नाव अर्जुनास देऊन तो आपलीच विभूति आहे, असे दाखविले; जसे–

'पांडवांना धनंजय:' या श्री. भ. गीतेतील १० वे अध्यायाच्या ३७ वे श्लोकात म्हटले आहे. तसेच कृष्णावतार बाबांनीही आपले मोहक, लाडके व अन्वर्थ नाव 'श्याम' हे माधवरावांना देऊन माधवराव ही आपलीच विभूति आहे, असे बाबांनीसुद्धा कित्येक प्रसंगी दर्शविले आहे.

कै. भक्तश्रेष्ठ नानासाहेब चांदोरकर यांच्या वडील चिरंजीवाचे लग्न ग्वाल्हेरीस झाले. आपण लग्नास यावे, म्हणून नानासाहेबांनी बाबांना समक्ष निमंत्रण केले. "माझ्या शाम्याला घेऊन जा", असे बाबा म्हणाले व त्याप्रमाणे माधवराव लग्नास गेले.

कै. भक्तवर्य काकासाहेब दीक्षित यांनी असेच आपल्या वडील चिरंजीवांचे लग्नाकरतां बाबांना समक्ष निमंत्रण केले, तेव्हाही "माझ्या शाम्याला घेऊन जा" असे बाबा त्यांना म्हणाले व त्याप्रमाणे माधवराव नागपुरास लग्नास गेले.

एकदा काकासाहेब दिक्षित फार गहिवरून बाबांकडे द्वारकामाईत आले. "काका तुला काय पाहिजे", म्हणून बाबांनी त्यांना विचारले. काकासाहेब म्हणाले, "बाबा, आपला सहवास असावा". बाबा म्हणाले, "ह्या श्याम्याला आपल्या जवळ ठेवून घे; म्हणजे मी जवळच आहे". ह्यानंतर काकासाहेब माधवरावांना बहुधा आपल्याजवळ ठेवीत.

एकदा कै. भक्त शौंड बाळासाहेब मीरीकर, मामलतदार, कोपरगांव यांचा मुक्काम दौंड मनमाड रेल्वेवरील कोपरगांव नजीक चितळी गावात श्री. मारुतिरायाचे मंदिरात असता, ते शिरडीस बाबांच्या दर्शनास आले. दर्शन घेतल्यावर परत चितळीस जाण्यास त्यांनी बाबांची परवानगी मागितली. बाबा म्हणाले, "जा, पण माझ्या शाम्याला बरोबर घेऊन जा". बाळासाहेब बाबांच्या आज्ञेप्रमाणे माधवरावास बरोबर घेऊन गेले. त्याच रात्री बाळासाहेबांचे अंगावर मोठा थोरला भयंकर सर्प त्यांना नकळत चढला, पण

त्याने दंश करण्याचे पूर्वीच बाळासाहेबांनी त्याला हातानेच लांब उडवून दिले. जवळच्या लोकांनी त्याचे तुकडे तुकडे केले. माधवरावांचे सान्निध्याने व बाबांच्या कृपेने बाळासाहेब या प्राण संकटातून वाचले.

श्रीमंत बापूसाहेब बुटी माधवरावांना बाबांप्रमाणे मान देत.

यावरून अर्जुन-कृष्णाचे जोडीप्रमाणे ही माधवराव बाबांची जोडी म्हणजे श्याम माधवाची (माधव-कृष्णरूप बाबा) जोडी होती, असे म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाही, असे मला वाटते. याचे प्रत्यंतर पुढेही काही बाबतीत येईलच.

माधवरावांना बाबा जसे पहिल्यापासून शेवटपर्यंत 'श्यामा' म्हणून संबोधीत तसेच माधवरावही बाबांना प्रथमपासून शेवटपर्यंत 'देवा' म्हणून संबोधीत.

(पुढील अंकात चालू)

## साईवंदना

ॐ नमो वरदायिनी श्री साई, मातृदेवते
शांतिमूर्ते! महाकीर्ते नमस्ते, प्रणमामि ते॥धृ॥

श्रद्धा-तितीक्षा एवैक: तव मंत्रोऽस्ति
त्वत्‌चरणात् न कोऽपि रिक्तो गच्छति
भक्ता: नानाविधा: शिलधे: समायान्ति
तव प्रेरणया एव स्तोत्रं एतद् गायामि॥१॥

साईसच्चरित्रे एव वेदानां भाण्डारम्
तत्र एव उपनिषदानां सारम्
सर्वाणि धर्माणि त्वया आत्मीकृतानि
अतोऽहं साईचरितं शिरसि धारयामि॥२॥

प्रज्वलितो अग्नि: शरीरस्य विनाशित्वं सूचयति
तस्य भस्मं निर्ममत्वं, निर्मोहत्वं दर्शयति
तव स्तुतये शब्दो: नास्ति, किन्तु प्रयत्नं करोमि
भगवन्, तव कृपादृष्ट्या मां पाहि॥३॥

— सौ. संगीता गोडबोले

# दिव्य जीवनाकडे - ८

आपण साधनेच्या सर्वसाधारण विचारांचा परामर्श घेतला. आता थोडे अधिक तांत्रिक पण शुद्ध बोल ऐकू या.

**आर्वीकर महाराज :-** साधनेत शब्दाला महत्त्व आहे. अर्थानुसारी वाणी ही ''**वैखरी**'' होय! हीच वाणी मूलाधार व स्वाधिष्ठान या दरम्यान उठते, त्यावेळी कंठाकडे आपणच ती ऐकतो; त्यावेळी तिला ''**मध्यमा**'' म्हणतात. मणिपूर चक्राकडे, म्हणजे बेंबीजवळून ती उठते, त्यावेळी ती केवळ स्पंदात्मक असते; तिला ''**पश्यंती**'' म्हणतात. हृदयातून उमटणारी मूळ शुद्ध, अहंकारप्रेरणा ''**परावाणी**'' असते. या शब्दाद्वारेही आनंदमय शिवाकडे जाता येते. हा शिव बिंदूंना घेऊन ब्रह्मरंध्री विराजतो. त्या बिंदूची शक्तीरूप स्पंदने ही प्रकाशमय शक्ती असते. हीच शक्ती कंठचक्राकडे शब्दरूप, तर हृदयचक्राकडे नादरूप असते. ही शक्ती मूलाधाराकडे अबोधरूप असते, तर मणिपूराकडे बोधरूप बनते. हृदयचक्राकडे ती ''प्रत्यक्'' ज्योती बनते. मानवाची जाणीव शब्द, प्राण वा शक्तीद्वारे प्रगट होत असते. तिला शब्दातून वा प्राणशक्तीतून विशाल विश्वात्मक प्रेमाकडे फेकायचे असते. आत जाताना मन, बुद्धी, वृत्तीसह दिव्यत्त्वाकडे जायचे. बाहेर पडताना विश्वात्मक शुद्ध अहंकाराकडे, विश्वप्रेमाकडे जायचे असते. अशी आपली शुद्ध जाणीव साधनेद्वारे (शक्ती, नाद, शब्द, प्राण या माध्यमांद्वारे) परमेश्वराकडे, विश्वात्मकतेकडे नेणे, हाच दिव्य जीवनाचा अमृतमय मार्ग आहे.

**श्री. खानविलकर :-** चित्तवृत्तिनिरोध म्हणजे योग, मनावर नियंत्रण मिळविण्यासाठी शरीर जिंकले पाहिजे. यासाठीच षटकर्मविधि, त्राटक, आसन, जप यांचा आधार घ्यावा लागतो. श्वासयुक्त नाम शब्दनादाकडून ॐकाराकडे नेते. केवलंकुभक, योगमुद्रा, तीन बंध ही साधने शरीर, मन, विचार यांवर नियंत्रण ठेवतात. नाभीतील परमात्मा उदरातील मायेमुळे सगुण साकार होऊन मन व डोके शांत करतो. प्रत्याहाराने मन आवरून ध्यानधारणेने, मानसपूजेने हृदयाद्वारे सहस्त्राराकडे जायचे असते. वृत्ती ही हृदयातून स्फुरते. ती मस्तकात शिरते. तेथे ती अस्मिता होऊन रहाते. यामुळे मानसपूजेलाही महत्त्व आहे. मानसपूजा ही ध्यानाचीच कवायत आहे. मानसपूजेत मन अनेकाग्र होते. ध्यानात ते एकाग्र होते. हृदयात एकाग्र केल्यास भावनेत

वेधशक्ती येते. भ्रूमध्यावर एकाग्रता बुद्धी स्थिर करते. मूर्तीवर सगुण ध्यान केल्यास मन लवकर एकाग्र होते. भगवंत समाधीत सोडतात. नादावर एकाग्रता केल्यास प्राणमन लय होतो. ग्रंथीभेद होतो. निवात दीपवत् चित्त, हीच समाधी होय! तुकाराम म्हणतात **''स्थिरावली वृत्ती। पांगुळला प्राण। अमृताची खूण। पावोनिया।।'' ''चित्त चाकाटले। स्वरूपामाझारी। न रिघे बाहेरी। सुखावलो।।'' ''अंतरीची ज्योती। प्रकाशली दीप्ति। मूळीची जी होती। आच्छादिली।।''**

- योगविद्या

**श्री. जठार (स्वानंदसाम्राज्य) :-** वैखरीच्या जपाने शेवटी परेच्या जपाकडे जायचे आहे. मध्यमेचा उपांशुजप कंठाकडे होत असतो. याने मनाचे नादात विलीनीकरण होते. अष्टभाव हृदयात फुलतात. नाम प्रकाशाच्या अक्षरात दिसते. पश्यंतीचा जप हृदयाजवळ होतो. यामुळे भावनेत वेधशक्ती येते. संकल्प सिद्ध होतात. कालाचे भान जाते. परावाणीचा जप बेंबीपाशी होतो. नाम व रूप एक होते. सत्तारूप जाणीव उरते. (एकनाथ म्हणतात की, सोऽहं साधनेने आज्ञाचक्राजवळ काकीमुख उघडते. हठयोग्यांना हे साधत नाही.)

**श्री. परांजपे (संजीवन चिकित्सा) :-** **सहस्त्रदलकमल** हे बुद्धीचे स्थान. येथूनच अंत:करणाच्या सल्ल्याने बुद्धी काम करते. **मनाची (वेणीस्थानाची)** संगत धरल्यास बुद्धी पंचविषयात रमते व पतन पावते. **शतदलकमल (अंतर्मन)** हे नियुक्त मन होय! **प्रयोगी मन (वेणीस्थान)** व **अहंकार (बेंबीस्थान)** यांच्या कर्म व वासनांच्या जंजाळातून सुटून सहस्त्रदलातील आत्म्याच्या व बुद्धीच्या सहाय्याने वागा. हेच दिव्य जीवनाचा मार्ग दाखवील. बेंबीचे कर्म, अहंकार, वेणीस्थानचे मन, शतदलाची स्मृती मानवाला मागे खेचते. सहस्त्रदलातील आत्मबुद्धी हिच्याशी शतदलातील चित्त जडवा. इंद्रिये व अहंकार यासह हृदयातून वावरू नका. हे साधनेतील दैनंदिन वागणुकीचे पथ्य सांभाळा. आत्मबुद्धीने वागणे हितकारक आहे.

**टीप :**

**दिव्य जीवनाचे कोश :-** शरीराच्या आत प्राणमय कोश आहे. बेशुद्ध माणूस या कोशातून झोपेतून जागृत झाल्यासारखा उठतो. मृतात्माही या कोशात १० तास असतो. त्या पलीकडे सूक्ष्मदेहाचा कोश आहे. ही (astral body) वासनादेह मनोज आहे. त्याला दिशा बांधत नाहीत. इच्छा, वासनांची ही अस्तित्वाला पडलेली गांठ आहे. या देहात मृताच्या तीव्र इच्छांचे ठसे असतात. त्या पलिकडचा मनोदेह (mental body) हा ऊर्मीच्या स्वरूपाचा असतो. या उर्मी पलिकडील कारणदेह (casual body) हा ज्ञानदेह आहे. वासनादेह व मनोदेह यांतील इच्छा व ऊर्मी

झडल्यावरच कारणदेहाचे ज्ञानकवच मिळते. त्यानंतरचे विज्ञानदेह, आनंददेह हे उच्च देह आहेत. प्राणमयदेह व वासनादेह हे भुवर्लोकातच गळतात. मनोदेह व कारणदेह हे स्वर्लोकाच्या प्रांतातील आहेत. महर्लोक, जनोलोक, तपोलोक व सत्यलोक हे उच्च स्तरावरील जग आहे. कारणदेहातून संत प्रगट होतात व मार्गदर्शन करतात. कारणदेह ही भौतिक व दिव्य विश्व यातील खरीखुरी सीमा वा सरहद्द आहे.

# प्रवचनसेवेत आलेले अनुभव

**- श्री. अनिल केशवराव रसाळ**
वडाळा (पूर्व), मुंबई.

प्रवचनांद्वारे साईप्रेमाचा प्रकाश दूरवर पसरवण्याची प्रक्रिया श्रींनी मला १९८७ साली केली. अचानक मला उत्कट वाटू लागले की, श्रींचे चरित्र व श्री मद्भगवद्गीता यांच्यात फारच जवळचा संबंध आहे. त्यादृष्टीने श्रींनी मला फार मोठी संधी ''ऑल इंडिया साईसमाज'' या प. पू. श्री नरसिंहस्वामींनी स्थापन केलेल्या संस्थेच्या मद्रास येथील सभागृहात दिली. सर्व भारतातून श्री साईभक्त फार मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यातील बहुतेक भक्तांशी माझा पत्रांद्वारे व प्रत्यक्ष परिचय होता. त्यामुळे वैयक्तिक माझ्यावर फारमोठी जबाबदारी पडली होती. परंतु मनोमन माझी अशी श्रद्धा होती की, श्री बाबाच हे प्रवचन करणार आहेत व आपण केवळ निमित्त आहोत.

प्रवचनाच्या दिवशी पहाटे मला फारच चमत्कारिक स्वप्न पडले. मी ज्यांना वंदनीय समजत होतो, अशा दोन भक्तांना श्रींनी दाखवले व सांगितले की, यांना आज तुझ्याविषयी मत्सर वाटत आहे व येथूनपुढे अशा मत्सरी लोकांची संख्या वाढेल, पण त्याचे वाईट वाटून घेऊ नये. खरोखर, असा अनुभव नंतरही आला.

प्रवचन इंग्रजीत होते व विषय श्री मद्भगवद्गीतेतील ९ व्या अध्यायातील २२ व्या श्लोकाचे विवरण श्री साईसत्चरितातील कथांद्वारे विशद करण्याचा होता. प्रवचनाची सुरुवात झाली व अचानक सभागृहातील गोंगाट बंद झाला. टाचणी पडली तरी ऐकू येईल, इतकी शांतता आपोआप निर्माण झाली. लोकांच्या डोळ्यांत मला प्रवचनाचा परिणाम दिसू लागला. माणसाचे डोळे त्याच्या सर्व मानसिक पिंडांची हालचाल दाखवितात. श्रोत्यांची स्तब्धता व त्यांची एकाग्रता मला फारच विलक्षण वाटली; पण त्याहीपेक्षा मला जो फार मोठा चमत्कारिक अनुभव आला, तो म्हणजे तयारी न करता सर्वकाही उत्कट झाले. ते इतके की, एका ख्रिश्चन भक्ताने मला

सभागृहातच दुसरे प्रवचन करण्याचे निमंत्रण दिले!

श्रींनी प्रतिमेची अशी एक पणती पेटवली आणि मला जाणवू लागले की, श्री साईसत्‌चरितातील प्रत्येक अध्यायावर प्रवचन करता येईल. वास्तविक मी स्वत: सर्व निर्णय श्रींच्या आज्ञेने घेतो; कारण त्यामुळे श्रींच्या इच्छेत रहाण्याची सवय होते. दीर्घमुदतीच्या आजाराच्या काळात मला एके दिवशी सत्संग सुरु करण्याची प्रेरणा झाली. श्रींनी या विचाराला चिठ्ठीच्या कौलाने होकार दिला. त्याचक्षणी दरवाजाची कॉलबेल वाजली व शिर्डीचा प्रसाद आला.

७ मे १९८७ रोजी केवळ पाच भक्तांच्या उपस्थितीत २१व्या अध्यायाच्या वाचनाने व त्यावरील प्रवचनाने व श्री विष्णुसहस्रनाम पाठाने सुरुवात झाली. श्री. प्रेमानंद मयेकर ह्या भक्ताने हा अध्याय वाचला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्याचे नाव या अध्यायाच्या सुरुवातीच्या ओवीत आले!

प्रवचनसेवेने श्रींना दोन गोष्टी प्रामुख्याने साधायच्या होत्या. पहिली गोष्ट म्हणजे, आपल्या भक्तांना आचारसंहिता द्यायची होती व दुसरी गोष्ट ही की, त्यांच्या बहुसंख्य आर्त भक्तांना जिज्ञासू करायचे होते.

श्री साईसत्‌चरितातील ५३वा अध्याय व २१वा अध्याय दोन वर्षे दोन वेळेला वाचून त्यावर प्रवचने झाली. म्हणजे १०७ आठवडे ही प्रवचनं सातत्याने होऊनही त्याला शिळेपणा आला नाही. पारिजातकाच्या वेलीने रोज फुलं पाडावीत, आपण ती इतरांना वाटावीत व दुसऱ्या दिवशी पुन्हा नवीन सडा पडावा, तसं झालं!

मला स्वत:ला ''बोलविता धनी वेगळाची'' असा क्षणोक्षणी अनुभव आला; पण येणाऱ्या भक्तांनासुद्धा त्यांच्या वेगवेगळ्या समस्यांची उकल त्या त्या दिवशीच्या प्रवचन सेवेत मिळू लागली. खरं म्हणजे, मी काहीच करीत नाही, ह्या भावनेने करीत असल्याने व येणारे श्रीभक्तही तितक्याच ओढीने येत असल्याने, श्रींनी अशी कृपा केली. यात खरोखरच माझे काहीच नव्हते! ज्याचा जसा विश्वास होता, तसा अनुभव त्या त्या भक्ताला श्रींनी दिला इतकेच!

प्रवचनसेवेत मला श्रींच्या भक्तांचे आचरण फार जवळून पहायला मिळाले. स्वत: मला त्यामुळे फारच अभ्यास करता आला, तो श्रींच्या वेगवेगळ्या भक्तांच्या कसोट्या घेण्याच्या पद्धतीचा आणि या ठिकाणी काही भक्त उत्तीर्ण झाले; परंतु बहुतेकजण होऊ शकले नाहीत. याचं मुख्य कारण म्हणजे, त्या भक्तांना प्रवचन श्रवण करण्यापलीकडे जाता येत नव्हते. आचरण हा श्री साईभक्तीचा पाया आहे, हे त्यांच्या वैयक्तिक आचरणात तंतोतंत उतरले नव्हते. सामाजिक वर्तुळात वागण्याचे संकेत

पूर्णपणे पाळण्याच्या खटपटीत देवाशी नातं जोडताना वैयक्तिक आचरण अतिशय स्वच्छ, आदर्श ठेवलं पाहिजे, हे मात्र ते साफ विसरले. श्रींचे ऑडिटींग हे इंटर्नल असते, हे विसरण्याची फार मोठी चूक त्यांच्याकडून घडली.

मुख्यत: मला स्वत:ला खालील गोष्टी लिहाव्याश्या वाटतात, कारण त्यामुळे सर्व भक्तांचा वैयक्तिक, पारमार्थिक उत्कर्ष होऊ शकेल.

(१) आपण बहुसंख्य श्री साईभक्त प्रपंच व परमार्थ यांची उत्कृष्ट सांगड घालत नाही. सोयीनुसार आपण भक्ती करतो आणि प्रपंच व परमार्थ म्हणजेच प्रेयस् व श्रेयस् यांच्या निवडीत आपण प्रपंचाला केवळ अग्रक्रमच नव्हे, तर पूर्ण वेळ देतो. त्यामुळे भक्तीच्या समुद्रात पोहण्याऐवजी आपण "मी" पणाच्या डोहालाच समुद्र समजतो.

(२) श्रींनी जर प्रवचनसेवेतून किंवा त्या अनुषंगाने काही दोषदिग्दर्शन केले, तर त्याविषयी त्या व्यक्तीचा आपल्याविषयीचा आकस किंवा "टोमणे मारण्याची सवय" अशा सबबीखाली स्वत:कडे न्यायाधिशाच्या नि:पक्षपातीपणाच्या दृष्टीने न पाहता आपल्या दोषांची तरफदारी करण्याची "वकिली सवय" व युक्तिवाद फार मोठ्या प्रमाणात साईभक्तांत आढळला.

(३) अनुभव सांगताना दुसऱ्या भक्तांच्या अनुभवांविषयी साशंकता व आपले अनुभव सांगताना त्यांत किंचित का होईना, अतिशयोक्ती आढळली.

(४) सेवेची संधी मिळाली असता व ती जर सातत्याने मिळाली, तर अहंकार निर्माण होणे व त्यामुळेच सेवेकडे दुर्लक्ष होणे.

मला प्रमाणिकपणे वाटते की, हे दोष सर्वसामान्य भक्तांत निरहंकारी वृत्तीने व निष्कामतेने साधना न करण्याने येतात. त्यामुळे ते खालील गोष्टी केल्यास निश्चितच दूर होतील. हे उपाय वरील दोषांच्या क्रमानुसार दिले आहेत.

(१) "प्रेयस् व श्रेयस्" यांचा झगडा अतिशय अदृष्यपणे चालतो. त्यासाठी श्री साईसतूचरितातच जागोजागी बाबांनी आपल्याजवळ केलेल्या भक्तांना त्याची अनुज्ञा घेण्याचा पाठ घालून दिलेला आहे. माझ्या एका जवळच्या भक्ताने प्रवचन व पर्यटन अशी संधी आली असता, पर्यटनाला प्राधान्य दिले. त्यावेळी त्याने चिठ्ठीचा कौल घेतला नाही व इतकी प्रवचनं ऐकूनही एकदा घेतलेला चिठ्ठीचा कौल त्रास होईल, ह्या भीतीने आचरणात आणला नाही. स्वाभाविकच प्रगतिपथावर चालायचं असेल, त्या भक्ताने आपल्याला "काहीच कळत नाही" ह्या भूमिकेतून श्रींची अनुज्ञा घेऊनच काही वर्षं काम केल्यास हा दोष घालवता येईल.


(२) दोष हे दूर झाल्यास आपलाच फायदा होणार आहे, असं मनोमन समजून ते श्रींनी आपल्या पारमार्थिक उत्कर्षासाठी दाखविले आहेत, अशी खात्री बाळगावी व ते कसोशीने दूर केलेच पाहिजेत. तसे दोष दाखविणारा हा नि:स्वार्थी असल्याशिवाय असं बोलणार नाही, हे समजलं पाहिजे.

(३) मला वाटतं की, सर्वांच्या हृदयात श्री साईविषयीचं प्रेम खरं आहे, असं आपण समजलं की, त्यामुळे दुसऱ्यांच्या अनुभवांविषयींची साशंकता राहणार नाही. त्याचबरोबर आपण आपल्या अनुभव निवेदनात अतिशयोक्ती आणल्यास, ते श्रींना कळतं, हे समजून आपण ती जाणीवपूर्वक टाळली पाहिजे; कारण श्री तसं न केल्यास अनुभव देणं बंद करतात.

(४) सेवेच्या सातत्याने येणाऱ्या संधीला आपण भक्तिमार्गातील प्रदीर्घ कसोटी समजली पाहिजे. कारण सतत सेवा करणाऱ्याला सर्वजण मानू लागतात, त्याच्या पाया पडतात. "आपल्याला खूप कळते" असं दाखविण्यासाठी धडपडणारे भक्त त्याची तोंडावर खूप व बारेमाप प्रशंसा करतात. त्यामुळे सेवा करणारा स्वत:ला खूप मोठा समजू लागतो व घसरतो. ही खरोखर फार मोठी कसोटी आहे व ती देण्यासाठी सेवा करणारा पूर्ण निरहंकारी असला पाहिजे. तो तसा नसल्यास इतरजण त्याचं अनुकरण करतात. म्हणून सेवा करण्यापूर्वी ही तुझी सेवा तूच करून घेत आहेस, असं मनोमन देवाला प्रार्थनापूर्वक सांगितलं पाहिजे व जेव्हा ती उत्कृष्ट होईल, तेव्हाही तूच केलीस, म्हणून देवाला सांगून आपण "अलिप्त" झालं पाहिजे; कारण त्यानेच आपली अबाधित प्रगती होणार आहे.

**अर्जुन :** बघति सगुण तुज आकारातून
बुडवून डोळे नित्य तुझ्यावर
ध्याति तुला जे श्यामसुंदरा
भक्त तेच का तुजला प्रियतर
परब्रह्माचे ज्ञाते पंडित
भजती निर्गुण निराकारता
या दोघातील अधिक जाणता
सांग प्रभो मज सांग कोणता

– गीता



# साई - मार्ग

- श्री. शाम जुवळे
दादर (प.), मुंबई.

गेल्या साठ वर्षांहून अधिक काळ साई-शिकवणीतून वेचलेली काही प्रज्ञा-प्रबोध-पुष्पें :-

* आचरणात आणता येईल एवढेच वाचेने वदावे; अन्यथा मौन पाळावे.

* प्रेमयुक्त विचार, हेच खरे सत्य होय;
प्रेमयुक्त-आचरण, हाच धर्म होय;
प्रेमयुक्त स्वभाव, हीच शांती होय;
प्रेमयुक्त जाणीव, हीच अहिंसा होय!

* प्रेम म्हणजेच परमेश्वर होय;
प्रेमयुक्त जीवन जगणे, म्हणजेच देवभक्ती करणे होय!

* परमेश्वरा प्रित्यर्थ एक अश्रू ढाळला असता, तो आपले हजार दुःखाश्रू पुसून आपले प्रेमपूर्वक सांत्वन करीत असतो, हे साईप्रणित सत्य होय!

* विघातक स्पर्धा, तसेच वितंडवाद करू नये; श्रद्धा व सबुरी ठेवून परमार्थाची वाटचाल करावी, हाच जीवनात यशस्वी होण्याचा साई-मार्ग होय!

* सत्याचा प्रचार, धर्माचा आचार, प्रेमळ वागणूक व शांतीचा स्वभाव ठेवून जीवन जगावे व मानव-जन्म सार्थकी लावावा.

* कमळ पाण्यामध्ये जन्म घेते, तरीही उंच झेप घेऊन त्यापासून दूर वसत असते; तद्वतच भक्ताने जगामध्ये जन्म घेऊनही साधनेद्वारे जीवनमान उंचावून जगापासून अलिप्त राहावे, हाच सुखाचा साई-मंत्र होय!

* समदृष्टी ही शुभ-दृष्टी होय! मतभेद असले, तरी ते दोन नेत्रांसारखे असावेत. एकच वस्तू प्रत्येक नेत्राला वेगवेगळी दिसू शकते; परंतु तीच वस्तू दोन नेत्रांनी एकाच वेळी पाहिली असता, त्यात समन्वयपणा दृष्टीस पडतो; तद्वतच दोन व्यक्तींमध्ये मतभेद असू शकतात; परंतु समजुतीने त्यात समन्वय साधता येतो व त्यायोगे वितुष्टपणा टाळता येणे शक्य होते. हा साई-सदुपदेश होय!

* सेवा ही श्रेष्ठ साधना आहे. स्वार्थहीन सेवा केली असता, अहंकार लीन होत असतो व उच्च-नीच हा भेद राहत नाही. विविधतेत अभेदाने वसावे.

* प्रेम हे स्वार्थहीन असते, तर स्वार्थ प्रेमरहित असतो. प्रेम हे नाते जोडते, तर स्वार्थ शत्रुत्त्व निर्माण करतो. प्रेमगृहात निवास असावा, हेच सर्वोत्तम होय!


* ''बनता बनता बनेल'' याचा अर्थ वासना हळूहळू कमी करून मन निर्वासन करणे. निर्वासन मन हे श्री साई-समाधि-स्थान होय! जप करण्याकरिता वा ध्यान करण्यासाठी या पवित्र स्थानाचा वापर केला असता, जीवनास लागणारी प्रशांती त्वरित उपलब्ध होऊन भक्त नित्य साई-सान्निध्यात वावरू शकतो.

अशा तऱ्हेने जीवन-प्रवाह वाहत ठेवल्यास अंती भक्त श्री साईंच्या पवित्र-चरणीं विलीन होत असतो. हे साई-शिकवणुकीचे सार होय!

# नामस्मरण

**- श्री दिलीप बा. सावंत**
खोपोली, रायगड.

आपले जीवन देवाच्या हाती आहे आणि देव नामाच्या स्वाधीन आहे. नाम सत्कर्माचा पाया आहे, तसा कळसही आहे. नाम, संत आणि भगवंत, असा हा त्रिवेणी संगम असून ते एकमेकांना चिकटून आहेत. त्यात महत्त्व नामाला आहे. उपासना कोणतीही असली, तरी नामाशिवाय पचनी पडत नाही. नामाचे सामर्थ्य फार विलक्षण आहे. पूर्वी घडलेले अपराध नाम नाहीसे करते. वाया गेलेल्यांना तारते. नाम हा सर्व प्रार्थनांचा, सेवेचा व पुजेचा राजा आहे. सर्व ठिकाणी, सर्व अवस्थांमध्ये कोणालाही करता येण्यासारखे नाम, हेच एक साधन आहे. नामाने कलिची बाधा (सत्ता) नाहीशी होते. वाईट किंवा विषयाच्या वासनेने बुद्धी भ्रष्ट करणे, हेच कलिचे मुख्य लक्षण होय! भगवंताचे नाम हे सर्व रोगांवर रामबाण औषध आहे. जरी नाम हे अतिशय सुलभ (सोपे) असले, तरी ते अतिशय दुर्मिळ आहे, असे संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात. ''ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ, सर्वत्र दुर्लभ विरला जाणे'' नामापेक्षा श्रेष्ठ तत्त्व दुसरे नाही. नामस्मरणासारखा दुसरा श्रेष्ठ धर्म नाही. भू-पासून वैकुंठापर्यंत नेणारी वाट म्हणजे अखंड नामस्मरण. नाम हे तीर्थयात्रेपेक्षा श्रेष्ठ आहे. अंतरंगात बदल होण्यासाठी यात्रा करावयाची असते, पण त्याला श्रम, पैसा, प्रकृती वगैरे गोष्टी अनुकूल असाव्या लागतात. घरबसल्या कोणत्याही ठिकाणी नाम घेता येते. नामाशिवाय ह्या जगात दुसरे आहे तरी काय! संत हे देवासमान असल्याने त्यांचे नामस्मरण करा. त्यातच आपले भाग्य आहे. श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबा हे



श्रेष्ठ संत होऊन गेले. त्यांनी लोकांना "श्रद्धा-सबुरी"चा महामंत्र देऊन श्री साईनाम जगात अमर केले आहे. तिथे येणाऱ्या प्रत्येक भक्ताचे भाग्य, पूर्वपुण्याई, भावना, श्रद्धा, भक्ती इत्यादि गोष्टी जरी कारणीभुत ठरत असल्या, तरी "अनंत कोटी, ब्रह्मांडनायक जगद्गुरु सद्गुरु श्री साईनाथ महाराज की जय!" हा बाबांचा आशीर्वाद आहे. दर्शनाच्या अवधीमध्ये इतके असंख्य साक्षात्कार, अनुभव आले की, ते येथे शब्दांकित करणे शब्दसंख्या मर्यादिअभावी देणे शक्य नाही. श्री साईंनी शब्दमर्यादेवरही अंकुश ठेवून कमी जास्त न होता यथोचित वर्दविण्याचा प्रयत्न माझ्याकडून केला आहे.

**"रघुपती राघव राजाराम,<br>पतीत पावन श्री साईनाम॥"**

प्रत्येक भक्ताच्या जीवनात अखंड नाम स्मरणात राहील, असे महान ब्रीदवाक्य श्री साईबाबांनी शिर्डीला करून ठेवले आहे. बाबा म्हणतात, केवळ "श्रद्धा" असून चालत नाही, त्याबरोबर "सबुरी" असणे आवश्यक आहे. माझ्यावर श्रद्धा ठेवा व नामस्मरण करा. मग मी सदैव तुमच्या सेवेला हजर राहीन. माझ्या भक्तीत नियमितपणा ठेवा. अखंड साईनामस्मरण करा. तुमची संकटे, दुःख आपोआपच दूर पळतील. श्री साईबाबांनी मला श्री विठ्ठल रूक्मिणी, श्री संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या रूपात प्रत्यक्ष दर्शन घरी दिले. हे सर्व श्री साईनामाने शक्य झाले. ह्या नामात फार मोठा अर्थ भरलेला आहे. बाबांच्या विषयी अनेक चमत्कार व अनुभव भक्तांना आले आहेत. आपणही "श्रद्धा-सबुरी" ठेवली, म्हणजे श्री साईनामस्मरण करून जीवन सुखी, समाधानी, आनंदी होईल.

**श्रीकृष्ण : नाचे माझ्या भजनगायनी<br>स्थिरावूनी मन जो माझ्यावर<br>भक्तीने ओथंबे अंतर<br>ज्ञानी मजला प्यार भक्तवर**

**- गीता**

# श्री साईंचे सत्य चरित्र-अध्याय ४ था

- सटिक गद्य अनुवाद :-
ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

(मागील अंकावरून पुढे चालू)

**मधमाधम मी महापातकी शरण तुझ्या पायां।**
**आलों निवारा दासगणूचें त्रिताप गुरुराया।।१४।।**

नीचात नीच (अधमाधम) मी (दासगणू) महापातकी आहे. तुझ्या पायी शरण आलो आहे. हे गुरुराया! माझे त्रिताप (तिन्ही प्रकारची, म्हणजे आध्यात्मिक, आधिदैविक व आधिभौतिक दुःखे) दूर करा (निवारा). ।।१४।।

असो. लोक (आपली) महाभयंकर (अघोर) पापे धुऊन टाकण्याकरिता गंगेच्या ठिकाणी जातात, तर गंगा आपल्या पापांपासून सुटण्यासाठी (मुक्त होण्यासाठी) संतांच्या पायाला लागते. तेव्हा (साईबाबांचे) हे पवित्र चरण सोडून गंगेची किंवा गोदावरीची यात्रा करण्याची जरूरी नाही. भक्तिभावाने हे सौम्य (संत) स्तोत्र व साईबाबांचे गोड चरित्र ऐका (म्हणजे पुरे). (ओ. १०२-१०९)

जसे गोणाईला (नामदेवाच्या आईला) भीमरथीत (भीमा नदीत) नामदेव व तमालाला (कबीराच्या वडिलांना, सूत कातण्याचा व विणण्याचा धंदा करणाऱ्या मुसलमान कोष्ट्याला) भागीरथीत (गंगेत) कबीर सुदैवाने शिंपल्याच्या (मोठा शिंप. जलचर प्राण्यांच्या अस्थीचे सुपलीच्या आकाराचे रेषा असलेले मोठे आवरण, ज्याच्यात मोत्ये उत्पन्न होतात) आत प्राप्त झाले, तसेच हे साईनाथ तरुण सोळा वर्षाच्या वयात निंबाच्या झाडाखाली शिरडी गावात भक्तांसाठी प्रथम प्रकट झाले. प्रकट झाल्यापासूनच ते ब्रह्मज्ञानी (जगाचे कारण आणि मूलघटक असणारे जे ब्रह्म, ते जाणणारे) होते, विषयवासना (इंद्रियसुख भोगण्याची इच्छा) स्वप्नातही नव्हती, मायेला (मोह-ममतेला) तर लाथ मारून हाकलून दिलेली होती आणि मुक्ती (मोक्ष) त्यांच्या पायाशी लोळण घेत होती (चरणीं विनटली). बाबांचा जन्म कोणत्या देशात, कोणत्या पवित्र वंशात, कोणत्या मातापित्यांच्या पोटी (कुशी) झाला होता, हे कोणालाच कळत नव्हते (ठावे ना). त्यांची या अगोदरची परिस्थिति (पूर्व+अवस्था) व त्यांचे बाप (तात) कोण व आई (माता) कोणती, हे कोणास ठाऊक नव्हते. सर्व लोक विचारून विचारून (पुसतां पुसतां) थकले, पण कोणाला पत्ता लागला नाही. आईबाप, सगेसोयरे (गणगोत), जातभाई (एवढेच नाही तर) सर्व संसार